# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१८ – १९

**ज्ञानदीप वार्षिकांक प्रकाशन कार्यक्रम**

लोकमत

# ज्ञानदीप वार्षिकांकाचे पवारांकडून कौतुक

लोकमत न्यूज नेटवर्क

**दावडी :** खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचैलित हुतात्मा राजगुरु महाविद्यालयाचा शैक्षणिक वर्ष २०१७-१८चा ज्ञानदीप वार्षिकांक 'लोकनेते शरदरावजी पवारसाहेब : संसदीय कारकिर्दीचा सुवर्णमहोत्सव' या विषयावर काढण्यात आला होता. या अंकाची प्रत संस्थाध्यक्ष देवेंद्र बुट्टे-पाटील व राजमाला बुट्टे-पाटील यांनी माजी केंद्रीय मंत्री शरद पवार यांना भेट दिली.



ज्ञानदीप वार्षिक अंक शरद पवार यांना भेट देताना देवेंद्र बुट्टे-पाटील, राजमाला बुट्टे-पाटील.

अंक पाहिल्यावर पवार यांनी अंकातील लेख पाहून जुन्या आठवणींना उजाळा दिला व विद्यार्थ्यांनी जमा केलेली माहिती, अंकाची रचना, बांधणी याचे कौतुक केले. अंकातून विद्यार्थ्यांनी शरद पवार यांच्या कृषी, फलोत्पादन, क्रीडा, आपत्ती व्यवस्थापन, उद्योग आदी क्षेत्रांतील कार्याचा आढावा घेतला आहे. त्यांच्या विद्यार्थिदशेपासून आजपर्यंतच्या राजकारणातील, समाजकारणातील दुर्मिळ छायाचित्रे अंकात समाविष्ट करण्यात आली आहेत.

अंकाचे प्रकाशन राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष दिलीप वळसे-पाटील व आमदार सुरेश गोरे यांच्या हस्ते झाले आहे. संस्थाध्यक्ष देवेंद्र बुट्टे-पाटील यांनी पवारसाहेबांच्या संसदीय कारकिर्दीच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त त्यांच्या कर्तृत्वाला अभिवादन करणे तसेच पवारसाहेबांचे देशकारणातील योगदान, समाज आणि देशाविषयी केलेले चिंतन, त्यातून घेतलेले निर्णय, प्रागतिक विचारांनी काळापुढे राहण्याची साधलेली किमया नव्या पिढीपुढे संस्काररुपाने येण्यासाठी ज्ञानदीप वार्षिकांकाची निर्मिती करण्यात आल्याचे सांगितले. या वार्षिकांकाचे संपादन डॉ. संजय शिंदे यांनी केले आहे.

Hello Pune Gramin
Page No. 9 Dec 21, 2018
Powered by: erelego.com

# शरद पवार देशपातळीवर स्वीकारलेले नेतृत्व

## वळसे पाटील यांचे प्रतिपादन; राजगुरू महाविद्यालयात अंक प्रकाशन

**राजगुरुनगर, ता. ४ :** ज्येष्ठ नेते शरद पवार हे देशपातळीवर स्वीकारले गेलेले नेतृत्व आहे. रचनात्मक काम करणाऱ्या या नेतृत्वाकडे, आजच्या तरुणांनी 'रोल मॉडेल' म्हणून पाहिले पाहिजे, असे आवाहन माजी विधानसभा अध्यक्ष दिलीप वळसे पाटील यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात 'लोकनेते शरदरावजी पवारसाहेब : संसदीय कारकिर्दीचा सुवर्णमहोत्सव' या विषयावरील ज्ञानदीप वार्षिक अंकाचे प्रकाशन समारंभात सोमवारी (ता. ३) वळसे पाटील बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील होते. या प्रसंगी आमदार सुरेश गोरे, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर उपस्थित होते.



**राजगुरुनगर (ता. खेड) : 'लोकनेते शरदरावजी पवारसाहेब : संसदीय कारकिर्दीचा सुवर्णमहोत्सव' या विषयावरील ज्ञानदीप वार्षिक अंकाचे प्रकाशन करताना मान्यवर.**

आमदार सुरेश गोरे म्हणाले, "शरद पवार यांचे नेतृत्व बहुआयामी असून त्यांच्या दूरदृष्टी आणि धोरणी नेतृत्वाखाली महाराष्ट्राने विकासाचे अनेक टप्पे गाठले. देशातील शेतकऱ्यांचे जीवनमान उंचविण्यासाठी व शेतीसाठी तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी त्यांनी अखंड प्रयत्न केले."

या वार्षिक अंकाचे संपादन डॉ. संजय शिंदे यांनी केले आहे. प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांनी प्रास्ताविक केले. उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. जी. जी. गायकवाड यांनी आभार केले.

# शरद पवार रचनात्मक काम करणारं नेतृत्व : दिलीप वळसे

राजगुरुनगर । वार्ताहर

शरद पवारांनी राज्य व राष्ट्रीय स्तरावर सलग पन्नास वर्ष काम करताना राजकारणाच्या पलीकडे जाऊन समाजाच्या सर्वच क्षेत्रात रचनात्मक काम करून धोरणकर्ता म्हणून बजावलेली भूमिका जनसामान्यांना दीपस्तंभासारखी मार्गदर्शक ठरेल असे गौरवोद्गार राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष दिलीप वळसे पाटील यांनी काढले.



ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात 'लोकनेते शरदरावजी पवारसाहेब : संसदीय कारकिर्दीचा सुवर्णमहोत्सव' या विषयावरील ज्ञानदीप वार्षिकांकाच्या प्रकाशन समारंभात बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अ‍ॅड. देवेंद्र बुट्टेपाटील होते. या प्रसंगी आमदार सुरेश गोरे, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, बाळासाहेब सांडभोर, डॉ. रोहिणी राक्षे, अश्विनी मोरमारे, डॉ. किसन गारगोटे, उमेश आगरकर, सुभाष टाकळकर, माणिक पाटोळे, अंकुश कोळेकर, मुरलीधर खांगटे, प्राचार्य डॉ. एस.बी.पाटील, प्रबंधक कैलास पाचारणे उपस्थित होते.

दिलीप वळसे पाटील यांनी शरद पवार यांच्या कृषी, फलोत्पादन, क्रीडा, आपत्ती व्यवस्थापन, उद्योग आदि विविध क्षेत्रात केलेल्या कामाचा आढावा घेतला.

स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना दिलेले ५० टक्के आरक्षण, एनडीआरएफची केलेली स्थापना, कोकणरेल्वे उभी करण्यासाठी केलेले प्रयत्न याबद्दल सविस्तर माहिती दिली. देशपातळीवर शरद पवारांबद्दल खूप आदराची भावना असल्याचे सांगून दिल्लीतील एका कार्यक्रमात तत्कालीन राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांनी शरद पवारांबद्दल बोलताना त्यांनी कृषी क्षेत्रात निष्ठा आणि ध्येयाने अविरत काम केल्यामुळे देश अन्नधान्याच्या संकटातून बाहेर आल्याचे सांगून भारतातल्या दुसऱ्या हरितक्रांतीचे शिल्पकार म्हणून देश आज त्यांच्याकडे गौरवाने पाहतो आहे, असे म्हटले होते, ती आठवण या ठिकाणी सांगितली. शरद पवार हे फक्त राजकारणी नसून ते कुटुंबवत्सल आहेत. दिवाळीतील पाच दिवस सर्व पवार कुटुंबीय एकत्र येऊन शिक्षण, व्यवसायाचं पुढील वर्षाचं नियोजन करतात असे सांगितले. विद्यार्थ्यांनी सोशलमीडियाच्या आहारी न जाता अभ्यास, करिअरवर लक्ष केंद्रित करावे. शिक्षणाच्या माध्यमातून आपला उपजीविकेचा प्रश्न सोडवावा आणि जगण्यातला आनंद मिळविण्याचे आवाहन त्यांनी केले.

लोकमत पुणे, मंगळवार, दि. ४ डिसेंबर २०१८

# पवार हे अनेक योजनांचे जनक : वळसे-पाटील

## हुतात्मा राजगुरु महाविद्यालय : ज्ञानदीप वार्षिक विशेषांकाचे प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क

राजगुरुनगर : शरद पवार हे अनेक योजनांचे जनक आहेत. १९७२ च्या दुष्काळात 'फूड फॉर हंगर' घोषणेने स्वाभिमान दुखावल्याने त्यांनी बारामतीत 'फूड फॉर वर्कर' हा प्रयोग राबविला. त्यातून पुढे रोजगार हमी योजना जन्मास आली. १९९० च्या बीजिंग ऑलिंपिक स्पर्धेत कबड्डी स्पर्धेस प्रवेश देण्यात त्यांची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. 'घर तेथे संकरित गाय' ही योजना त्यांनी प्रत्यक्षात राबवून श्वेतक्रांती घडविली. अशा अनेक योजनांचे शरद पवार हे जनक आहेत, असे प्रतिपादन सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष दिलीप वळसे-पाटील यांनी केले.



हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या ज्ञानदीप या वार्षिक विशेषांकाचे प्रकाशन करताना दिलीप वळसे पाटील.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या 'लोकनेते शरदरावजी पवारसाहेब : संसदीय कारकिर्दीचा सुवर्णमहोत्सव' या विषयावरील ज्ञानदीप वार्षिक विशेषांक प्रकाशन सोहळ्यात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अ‍ॅड. देवेंद्र बुट्टे पाटील होते. याप्रसंगी आमदार सुरेश गोरे, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर, संचालक कोंडीभाऊ टाकळकर, बाळासाहेब सांडभोर, सुशील शिंगवी, डॉ. रोहिणी राक्षे, अश्विनी पोरपारे, किसन गारगोटे, उमेश आगरकर, सुभाष टाकळकर, अ‍ॅड. माणिक पाटोळे, अंकुश कोळेकर, मुरलीधर खांगटे, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, प्रबंधक कैलास पाचारणे उपस्थित होते.

दिलीप वळसे-पाटील म्हणाले की, विद्यार्थ्यांनी सोशल मीडियाच्या आहारी न जाता अभ्यास, करिअरवर लक्ष केंद्रित करावे. या वार्षिक अंकाचे संपादन डॉ. संजय शिंदे यांनी केले आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांनी केले. सूत्रसंचालन उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे यांनी, तर आभारप्रदर्शन प्रा. जी. जी. गायकवाड यांनी केले.

मंगळवार, दि. ४ डिसेंबर २०१८

# शरद पवारांची भूमिका दीपस्तंभासारखी

## राजगुरुनगर येथे दिलीप वळसे पाटील यांचे गौरवोद्गार

राजगुरुनगर, दि. ३ (प्रतिनिधी) - शरद पवार यांनी राज्य व राष्ट्रीयस्तरावर सलग ५० वर्षे काम करताना राजकारणाच्या पलिकडे जाऊन समाजाच्या सर्वच क्षेत्रात रचनात्मक काम करून धोरणकर्ता म्हणून बजावलेली भूमिका जनसामान्यांना दीपस्तंभासारखी मार्गदर्शक ठरेल, असे गौरवोद्गार राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष दिलीप वळसे पाटील यांनी काढले.

हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात लोकनेते शरदरावजी पवारसाहेब : संसदीय कारकिर्दीचा सुवर्णमहोत्सव या विषयावरील ज्ञानदीप वार्षिकांकाच्या प्रकाशन समारंभात वळसे पाटील बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खेड तालुका शिक्षण



राजगुरुनगर : हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात 'लोकनेते शरदरावजी पवारसाहेब : संसदीय कारकिर्दीचा सुवर्णमहोत्सव' या विषयावरील ज्ञानदीप वार्षिक अंकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

### हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात वार्षिकांकाचे प्रकाशन

प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील होते. याप्रसंगी आमदार सुरेश गोरे, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर, संचालक कैलासभाऊ टाकळकर, बाळासाहेब सांडभोर, सुशील शिंगवी, डॉ. रोहिणी राक्षे, अश्विनी मोरमारे, डॉ. किसन गारगोटे, उमेश आगरकर, सुभाष टाकळकर, माणिक पाटोळे, अंकुश कोळेकर, मुरलीधर खांगटे, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, प्रबंधक कैलास पाचारणे उपस्थित होते.

दिलीप वळसे पाटील म्हणाले की, शरद पवार हे फक्त राजकारणी नसून ते कुटुंबवत्सल आहेत असे सांगून पवारांच्या आदि विविध क्षेत्रात केलेल्या कामाचा आढावा घेतला. तसेच विद्यार्थ्यांनी सोशल मीडियाच्या आहारी न जाता अभ्यास, करिअरवर लक्ष केंद्रित करावे, असे त्यांनी नमूद केले. आमदार सुरेश गोरे म्हणाले की, शरद पवारांचे

> शरद पवार यांच्या संसदीय कारकिर्दीच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त त्यांच्या कर्तृत्वाला अभिवादन करणे तसेच पवारांचे देशकारणातील योगदान, समाज आणि देशाविषयी केलेले चिंतन, त्यातून घेतलेले निर्णय, प्रागतिक विचारांनी काळापुढे राहण्याची साधलेली किमया नव्या पिढीपुढे संस्कार रूपाने येण्यासाठी ज्ञानदीप वार्षिकांकाची निर्मिती करण्यात आली. पवार यांचा अफाट राजकीय अनुभव व आकलनशक्ती, मेहनती व संशोधक वृत्ती आणि शेतकरी, स्त्रिया यांच्या कल्याणासाठी अथक प्रयत्न करण्याची शक्ती आपल्यासाठी प्रेरणादायी आहे.
>
> - ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, संस्थाध्यक्ष, खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ

नेतृत्व कष्टाळू असून त्यांच्या दूरदृष्टी आणि धोरणी नेतृत्वाखाली महाराष्ट्राने विकासाचे अनेक टप्पे गाठले आहे, असे त्यांनी नमूद केले. या वार्षिकांकाचे संपादन डॉ. संजय शिंदे यांनी केले आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, सूत्रसंचालन उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे तर आभार प्रा. डी. जी. गायकवाड यांनी मानले.

---

# जनप्रवास

बुधवार, दि. ५ डिसेंबर २०१८

# शरद पवार रचनात्मक काम करणारं नेतृत्व : दिलीप वळसे

राजगुरुनगर । वार्ताहर

शरद पवारांनी राज्य व राष्ट्रीय स्तरावर सलग पन्नास वर्षे काम करताना राजकारणाच्या पलीकडे जाऊन समाजाच्या सर्वच क्षेत्रात रचनात्मक काम करून धोरणकर्ता म्हणून बजावलेली भूमिका जनसामान्यांना दीपस्तंभासारखी मार्गदर्शक ठरेल असे गौरवोद्गार राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष दिलीप वळसे पाटील यांनी काढले.

ते हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात 'लोकनेते शरदरावजी पवारसाहेब : संसदीय कारकिर्दीचा सुवर्णमहोत्सव' या विषयावरील ज्ञानदीप वार्षिकांकाच्या प्रकाशन समारंभात बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील



होते. या प्रसंगी आमदार सुरेश गोरे, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, बाळासाहेब सांडभोर, डॉ. रोहिणी राक्षे, अश्विनी मोरमारे, डॉ. किसन गारगोटे, उमेश आगरकर, सुभाष टाकळकर, माणिक पाटोळे, अंकुश कोळेकर, मुरलीधर खांगटे, प्राचार्य डॉ. एस.बी.पाटील, प्रबंधक कैलास पाचारणे उपस्थित होते.

दिलीप वळसे पाटील यांनी शरद पवार यांच्या कृषी, फलोत्पादन, क्रीडा, आपत्ती व्यवस्थापन, उद्योग आदि विविध क्षेत्रात केलेल्या कामाचा आढावा घेतला.

स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना दिलेले ५० टक्के आरक्षण, एनडीआरएफची केलेली स्थापना, कोकणातील उभी करण्यासाठी केलेले प्रयत्न याबद्दल सविस्तर माहिती दिली. देशपातळीवर शरद पवारांबद्दल खूप आदराची भावना असल्याचे सांगून दिल्लीतील एका कार्यक्रमात तत्कालीन राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांनी शरद पवारांबद्दल बोलताना त्यांनी कृषी क्षेत्रात निष्ठा आणि ध्येयाने अविरत काम केल्यामुळे देश अन्नधान्याच्या संकटातून बाहेर आल्याचे सांगून भारताच्या दुसऱ्या हरितक्रांतीचे शिल्पकार म्हणून देश आज त्यांच्याकडे गौरवाने पाहतो आहे, असे म्हटले होते, ही आठवण या ठिकाणी सांगितली. शरद पवार हे फक्त राजकारणी नसून ते कुटुंबवत्सल आहेत. दिवाळीतील पाच दिवस सर्व पवार कुटुंबीय एकत्र येऊन शिक्षण, व्यवसायाचं पुढील वर्षांचं नियोजन करतात असे सांगितले. विद्यार्थ्यांनी सोशलमीडियाच्या आहारी न जाता अभ्यास, करिअरवर लक्ष केंद्रित करावे. शिक्षणाच्या माध्यमातून आपला उपजीविकेचा प्रश्न सोडवावा आणि जगण्यातला आनंद मिळविण्याचे आवाहन त्यांनी केले.

सकाळ
बुधवार, ५ डिसेंबर २०१८ | ८

# शरद पवार देशपातळीवर स्वीकारलेले नेतृत्व

## वळसे पाटील यांचे प्रतिपादन; राजगुरू महाविद्यालयात अंक प्रकाशन

राजगुरुनगर, ता. ४ : ज्येष्ठ नेते शरद पवार हे देशपातळीवर स्वीकारले गेलेले नेतृत्व आहे. रचनात्मक काम करणाऱ्या या नेतृत्वाकडे, आजच्या तरुणांनी 'रोल मॉडेल' म्हणून पाहिले पाहिजे, असे आवाहन माजी विधानसभा अध्यक्ष दिलीप वळसे पाटील यांनी केले.



राजगुरुनगर (ता. खेड) : 'लोकनेते शरदरावजी पवारसाहेब : संसदीय कारकिर्दीचा सुवर्णमहोत्सव' या विषयावरील ज्ञानदीप वार्षिक अंकाचे प्रकाशन करताना मान्यवर.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात 'लोकनेते शरदरावजी पवारसाहेब : संसदीय कारकिर्दीचा सुवर्णमहोत्सव' या विषयावरील ज्ञानदीप वार्षिक अंकाचे प्रकाशन समारंभात सोमवारी (ता. ३) वळसे पाटील बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील होते. या प्रसंगी आमदार सुरेश गोरे, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर उपस्थित होते.

आमदार सुरेश गोरे म्हणाले, ''शरद पवार यांचे नेतृत्व बहुआयामी असून त्यांच्या दूरदृष्टी आणि धोरणी नेतृत्वाखाली महाराष्ट्राने विकासाचे अनेक टप्पे गाठले. देशातील शेतकऱ्यांचे जीवनमान उंचविण्यासाठी व शेतीसाठी तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी त्यांनी अखंड प्रयत्न केले.''

या वार्षिक अंकाचे संपादन डॉ. संजय शिंदे यांनी केले आहे. प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांनी प्रास्ताविक केले. उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. जी. जी. गायकवाड यांनी आभार केले.

पुढारी
पुणे, बुधवार
५ डिसेंबर २०१८

# खा. पवार यांचे काम रचनात्मक : वळसे पाटील

राजगुरुनगर : प्रतिनिधी

राज्य व राष्ट्रीय स्तरावर सलग ५० वर्षे काम करताना शरद पवार यांनी राजकारणाच्या पलीकडे जाऊन समाजाच्या सर्वच क्षेत्रात रचनात्मक काम केले. धोरणकर्ता म्हणून बजावलेली भूमिका जनसामान्यांना दीपस्तंभासारखी मार्गदर्शक ठरेल, असे गौरवोद्गार विधानसभेचे माजी अध्यक्ष, आमदार दिलीप वळसे पाटील यांनी काढले.



शरद पवार यांच्यावरील अंकाचे प्रकाशन करताना दिलीप वळसे पाटील आदी.

राजगुरुनगर (ता. खेड) येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात 'लोकनेते शरदरावजी पवारसाहेब : संसदीय कारकिर्दीचा सुवर्णमहोत्सव' या विषयावरील 'ज्ञानदीप' वार्षिक अंकाचे प्रकाशन झाले. या समारंभात वळसे पाटील बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील होते. आमदार सुरेश गोरे, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, प्रबंधक कैलास पाचारणे आदी मान्यवर या वेळी उपस्थित होते.

आ. गोरे यांनी मनोगत व्यक्त केले. प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांनी प्रास्ताविक केले. उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. जी. जी. गायकवाड यांनी आभार मानले.



लोकमत पुणे, गुरुवार, दि. २० डिसेंबर २०१८

# ज्ञानदीप वार्षिक अंकाचे पवार यांनी केले कौतुक

लोकमत न्यूज नेटवर्क

दावडी : खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचलित हुतात्मा राजगुरु महाविद्यालयाचा शैक्षणिक वर्ष २०१७-१८ चा ज्ञानदीप वार्षिकांकाची प्रत नुकतीच संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील व राजमाला बुट्टेपाटील यांनी शरद पवारांना भेट दिली.

अंक पाहिल्यावर त्यांनी साहेबराव बुट्टेपाटील यांच्याशी असलेल्या जुन्या आठवणींना उजाळा देऊन या अंकाच्या रचनेचे कौतुक केले. या अंकातून शरद पवार यांची संसदीय कारकीर्द विद्यार्थ्यांनी त्यांच्या लेखनीतून शब्दबध्द केली आहे त्याचे पवार यांनी कौतुक केले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख